#श्री#



श्री देव गजानन
(मु. पो. कासे, जि. रत्नागिरी)

कासे ग्राम गजानन सेवा मंडळ

(नोंदणी क्रमांक - एफ् ३८९८, मुंबई)
५२ वा वार्षिक अहवाल आणि जमाखर्च
२०२५-२०२६

पत्रव्यवहाराचा पत्ता

श्री. भूषण चंद्रकांत मालशे
५०२, अन्नपूर्णा क्षितीज सोसायटी, शिवसेना भवन पथ, दादर, मुंबई – ४०० ०२८
मोबाईल: ९८३३०६२६८५

५२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

प्रिय सभासद बंधु-भगिनी,

मंडळाची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ठीक ६.०० वाजता खोली क्र. १०१, तिरुपती ट्रेनिंग सेंटर, बी विंग, न्यू समाधान दत्तगुरू को-ऑप. हौसिंग सोसायटी, सेनापती बापट मार्ग, प्लाझा भाजी मंडईजवळ, दादर (पश्चिम), मुंबई - ४०००२८ येथे आयोजित केली आहे. सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून मंडळास सहकार्य करावे, ही नम्र विनंती.

सभेपुढील कामे

१) रविवार, दिनांक १४ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या ५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचन करून त्यास मंजुरी देणे.
२) सन २०२५- २०२६ या आर्थिक वर्षाचा अहवाल वाचून त्यावर चर्चा करून मंजुरी देणे.
३) सन २०२५- २०२६ या आर्थिक वर्षाचा जमाखर्च, ताळेबंद व लेखापरीक्षण अहवाल मंजूर करणे.
४) एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या आर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणूक निश्चित करणे.
५) एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या आर्थिक वर्षासाठी व्यावसायिक लेखापरीक्षकांची नेमणूक व त्यांचे मानधन निश्चित करणे.
६) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी मांडण्यात येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

स्थळ: मुंबई
दिनांक: २ सप्टेंबर २०२६

कार्यकारिणीच्या अनुज्ञेने
ग. पां. चव्हाण
कार्यवाह

टीप:

१) गणसंख्येअभावी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी ६.३० वाजता पुन्हा सुरू केली जाईल. अशा सभेस धर्मादाय आयुक्तांच्या नियमानुसार,गणसंख्येचे बंधन लागू राहणार नाही.
२) सभासदांना जमा-खर्चासंदर्भात काही प्रश्न विचारावयाचे असल्यास, संबंधित कागदपत्रे खजिनदार श्री. भूषण चंद्रकांत मालशे (दादर) यांच्या निवासस्थानी अवलोकनार्थ उपलब्ध असतील. वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास, ते सभेपूर्वी किमान ४ दिवस आधी कार्यवाह यांना लेखी स्वरूपात प्राप्त होतील अशा प्रकारे पाठवावेत, जेणेकरून सभेत चर्चा करणे सोयीचे होईल.

ग. पां. चव्हाण
कार्यवाह

कासे ग्राम गजानन सेवा मंडळ

(नोंदणी क्रमांक - एफ् ३८९८, मुंबई)

अध्यक्ष
श्री. प्रभाकर रामचंद्र पाटणकर

कार्यकारिणी

श्री. मिलींद मधुकर सुर्वे
कार्याध्यक्ष

श्री. गणपत पांडुरंग चव्हाण
कार्यवाह

श्री.अभिषेक मिलींद सुर्वे (सहकार्यवाह)
डॉ. श्री. दिवाकर जगन्नाथ परांजपे (सदस्य)
श्री. राजेंद्र रघुनाथ जाधव (सदस्य)
श्री. राहुल प्रकाश गवंडे (सदस्य)
सौ. माधुरी दिलीप पाटणकर (सदस्या)

श्री. भूषण चंद्रकांत मालशे (खजिनदार)
श्री. दिलीप अनंत जोशी (सदस्य)
श्री. विद्याधर गोपाळ मराठे (सदस्य)
श्री. निलेश नंदकुमार शिंदे (सदस्य)

स्थानिक समिती

श्री. अरविंद परशुराम भागवत.
श्री.शरदचंद्र रामचंद्र पाटणकर
श्री.रमेश विठोबराव सुर्वे.
श्री. कमलाकर गणपत सुर्वे.
श्री.मनोहर सखाराम शिंदे.

श्री. मनोहर कृष्णाजी पाटणकर.
श्री. दिलीप अनंत जोशी.
श्री. दिनेश मारुती सुर्वे.
श्री. अमित चंद्रकांत पवार.

अंतर्गत लेखा परीक्षक
श्री. अनिकेत दीपक मराठे

व्यावसायिक लेखा परीक्षक
श्री. विवेक प्र. रानडे, चार्टर्ड अकाउंटंट,
(रानडे ॲण्ड असोसिएट्स, विलेपार्ले, मुंबई)

बँकर्स

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड – दादर (पूर्व) शाखा, मुंबई

जनता सहकारी बँक लिमिटेड पुणे – माखजन शाखा,

स्टेट बँक ऑफ इंडिया – करी रोड शाखा, मुंबई

५२ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधु-भगिनी,

सप्रेम नमस्कार,

आपल्या मंडळाचा ५२ वा वार्षिक अहवाल व जमाखर्च श्रींचे कृपेने आणि आपल्यासर्वांच्या सहकार्याने सादर करताना अत्यंत आनंद होत आहे.

आर्थिक वर्ष २०२५- २०२६ या कालावधीत कार्यकारिणीच्या सहा (६) सभा यशस्वीरित्या पार पडल्या. या सर्व सभांना समाधानकारक उपस्थिती लाभली. कार्यकारिणीचे सदस्य तसेच निमंत्रित मंडळी या सभांना उपस्थित होती. सर्व विषयांवर सखोल चर्चा होऊन योग्य निर्णय घेण्यात आले, यासाठी सर्व सभासदांचे मंडळ आभारी आहे.

या वर्षी गोकुळाष्टमी, भाद्रपद श्री गणेश चतुर्थी, त्रिपुरी पौर्णिमा, महाशिवरात्र, हनुमान जयंती आणि गुढीपाडवा हे उत्सव सालाबादप्रमाणे श्री देव गजानन मंदिर, कासे येथे स्थानिक समिती व ग्रामस्थांच्या सहकार्याने उत्साहात साजरे करण्यात आले.

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही माघी जन्मोत्सव श्रींच्या मंदिराच्या मंगल परिसरात माघ शुद्ध प्रतिपदा सोमवार दिनांक १९ जानेवारी २०२६ ते माघ शुद्ध पंचमी, शुक्रवार दिनांक २३ जानेवारी २०२६ या कालावधीत संपन्न झाला. उत्सव काळात श्रींची षोडशोपचार पूजा व सहस्त्रावर्तने करण्यात आली.

माघ शु. प्रतिपदा, सोमवार - दिनांक १९.०१.२०२६- रात्रौ १०.०० वाजता कीर्तनकार ह.भ.प. श्री. राजेंद्र अरविंद मुळे (चाफे, रत्नागिरी) यांचे सुश्राव्य कीर्तन झाले.

तंत्रज्ञानाच्या युगात काळाच्या गरजेनुसार मंडळाच्या कार्यामध्ये अधिक पारदर्शकता, सुलभता व प्रभावी संवाद साधण्यासाठी गणेश मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळाचा (www.shreedevgajanankase.com) शुभारंभ करण्यात आला. या संकेतस्थळामुळे मंडळाची माहिती डिजिटल माध्यमातून सर्व सभासद, ग्रामस्थ व भाविकांपर्यंत सहजपणे पोहोचविणे शक्य होणार आहे. मंडळाच्या संकेतस्थळाद्वारे मंडळाचा इतिहास, उद्दिष्टे, कार्यकारिणी सदस्यांची माहिती तसेच संपर्क तपशील एका ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच गणेशोत्सव, माघी गणेशोत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, स्नेहसंमेलन इत्यादी विविध उपक्रमांची माहिती व वेळापत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येते. मागील वर्षांतील विविध उत्सव व कार्यक्रमांचे छायाचित्रे व व्हिडिओ गॅलरीद्वारे दर्शन घडते. तसेच सभासदांसाठी महत्वाच्या सूचना, घोषणा, बैठकींच्या तारखा आणि निर्णय सहजपणे कळविण्यात येतात. नवीन सभासद नोंदणी तसेच सूचना व अभिप्रायासाठी सुलभ संपर्क व्यवस्था या संकेतस्थळाद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे संकेतस्थळ अधिक उपयुक्त व परिणामकारक बनविण्यासाठी सातत्याने सुधारणा करण्यात येत असून, सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

माघ शु. द्वितीया, मंगळवार - दिनांक २०.०१.२०२६ - दुपारी ४.०० वाजता हळदी-कुंकू समारंभ झाला. यावेळी उपस्थित महिलांना अल्पोपहार, सरबत व भेटवस्तू देण्यात आल्या. सायंकाळी ४.३० वाजता श्री. दिलीप नर्सो पाटणकर यांनी "आठवणी उत्सवाच्या" या कार्यक्रमामध्ये आपल्या गावाचा इतिहास, पूर्वी उत्सव कसा साजरा केला जायचा, भजनी मंडळाची स्थापना कशी झाली तसेच कालांतराने या उत्सवात कोणते कोणते सकारात्मक बदल झाले याविषयी अत्यंत उत्तम आणि सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास सर्व भक्तांची विशेष उपस्थिती होती. रात्रौ १०.०० वाजता ग्रामस्थांनी भक्तिभावाने भजन सादर केले.



ग्रामस्थांचे भजन

माघ शु. तृतीया, बुधवार - दिनांक २१.०१.२०२६

या दिवशी सकाळी १०.०० श्रींच्या मंदिरात श्री. अथर्वशीर्ष हवन, तसेच श्री हनुमान व श्री व्याडेश्वर यांच्यावर रुद्राभिषेक करण्यात आला. या धार्मिक विधींचे पौरोहित्य श्री. आदित्य देशपांडे (पुणे) व श्री. सुयोग साठे (सरंद) यांनी भक्तिभावाने पार पाडले. श्री मंगेश मोहन मालशे व सौ मानसी मंगेश मालशे यांनी यजमानपद भूषवले. त्यांच्या भक्तिभावपूर्ण सहभागाबद्दल मंडळ आभारी आहे. सायंकाळी ६.०० वाजता, पारंपरिक वेशभूषेत महाआरती संपन्न झाली. मंदिराच्या मध्यभागी त्रिपुरावर, तसेच मंदिर परिसरात पणत्यांची रोषणाई करण्यात आल्यामुळे वातावरण अत्यंत मंगलमय व पवित्र झाले होते. उपस्थित ग्रामस्थ आणि भक्तगणांनी टाळ व तबल्याच्या ठेक्यावर आरत्यांचा जयघोष केला. सुवासिनींनी पंचारती घेऊन महाआरतीत सहभाग घेतला. त्यानंतर सर्व भक्तगणांना प्रसाद वितरित करण्यात आला.



श्री अथर्वशीर्ष हवन

माघ शु. चतुर्थी, गुरूवार - दिनांक २२.०१.२०२६- सकाळी ११.०० वाजल्यापासून श्रींचा जन्मोत्सव सोहळा अत्यंत उत्साहात व धार्मिकतेने संपन्न झाला. जन्माचे कीर्तन ह.भ.प. श्री. संदीप मुसळे (चिपळूण) यांनी अतिशय उत्तम रीतीने सादर केले. उत्सवात सादर करण्यात आलेल्या कीर्तनाला श्री आनंद लिंगायत (संवादिनी) आणि श्री मिलिंद लिंगायत (तबला) यांनी उत्कृष्ट साथ दिली.



कीर्तनकार ह.भ.प. श्री. श्री. संदीप मुसळे (चिपळूण) यांचे सुस्वर कीर्तन

श्री गणेश जन्मानंतर श्री गणेशाच्या पादुकांची मिरवणूक उत्साहात पार पडली. मिरवणुकीनंतर नवसपूर्ती व भजन स्वरूपात क्षमायाचना करण्यात आली. रात्रौ १०.०० वाजता स्थानिक कलाकारांच्या सहभागातून "विविध गुणदर्शन" (सांस्कृतिक कार्यक्रम) सादर करण्यात आला. या कार्यक्रमामध्ये पोवाडे, भक्तिगीते, लोकगीते तसेच नृत्यप्रकार अशा विविध कलात्मक सादरीकरणांद्वारे कलाकारांनी आपली कला प्रभावीपणे मांडली. स्थानिक बालकलाकारांनी सादर केलेल्या या कार्यक्रमामुळे उपस्थित रसिक प्रेक्षकांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. या यशस्वी कार्यक्रमाची पुनरावृत्ती दरवर्षी करण्यात यावी, अशी सर्वांनी इच्छा व्यक्त केली.



विविध गुणदर्शन" (सांस्कृतिक कार्यक्रम)

माघ शु. पंचमी, शुक्रवार - दिनांक २३.०१.२०२६ -सकाळी ११.०० वाजता सर्व भक्तांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. रात्रौ १०.०० वाजता "श्रीरंग" रत्नागिरी निर्मित, " येऊन येऊन येणार कोण " (लेखक: श्री चैतन्य सरदेशपांडे, दिग्दर्शक: श्री भाग्येश खरे) या नाट्यप्रयोगाचे सादरीकरण करण्यात आले. सर्व भाविक भक्तांनी नाट्यप्रयोगाला उत्तम प्रतिसाद दिला.

🌺 आभार 🌺

उत्सवानिमित्त श्री गजाननांच्या गाभाऱ्याची आकर्षक फुलांनी सजावट डॉ. श्री. अभिजित मधुकर जोशी यांनी स्वतःच्या खर्चाने केली. या फुलसजावटीमुळे मंदिरातील वातावरण अत्यंत प्रसन्न व भक्तिभावपूर्ण झाले. मंडळातर्फे त्यांच्या या सेवाभावी योगदानाबद्दल मनःपूर्वक आभार. सौ. अनुष्का अनंत शिगवण व कुमारी वेदिका अनंत शिगवण यांनी सुंदर आकर्षक रांगोळी साकारली होती. मंडळातर्फे त्यांच्या या कलात्मक योगदानाबद्दल मनःपूर्वक आभार. श्री अथर्वशीर्ष हवन यासाठी जागरण समितीने श्री दीपक मराठे यांच्या पुढाकाराने आर्थिक सहकार्य केले. श्री. डॉ. मधुकर अनंत जोशी यांनी सदिप आरतीचा प्रसाद दिला. श्री. रोहन कुडव यांनी महाप्रसादासाठी देणगी दिली. वरील सर्वांचे मंडळ आभारी आहे. नित्यपूजा निधी, सांजवात निधी, आरोग्य निधी, शिक्षण निधी आणि परिसर संवर्धन निधी यासाठी देणगीदारांचे मंडळ आभारी आहे.

उत्सवासाठी स्थानिक समिती, ग्रामस्थ आणि मंडळाचे कार्यकर्ते आधीपासूनच कामाला सुरुवात करतात, त्यामुळे उत्सव यशस्वीरीत्या पार पडतो. मुंबई, डोंबिवली, पुणे, सातारा आणि चिपळूण येथील रहिवासी ग्रामस्थांचे वर्षभर मिळणारे सहकार्य मंडळासाठी अत्यंत मोलाचे आहे. आपल्या मंडळाच्या संकेतस्थळाच्या निर्मितीसाठी व विकासासाठी श्री. अनिकेत मराठे आणि श्री. आदित्य नेवरेकर (वेबसाइट डेव्हलपर) यांनी अतिशय मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या तांत्रिक कौशल्यामुळे, परिश्रमांमुळे आणि सहकार्यामुळे हे कार्य यशस्वीरीत्या पूर्ण होऊ शकले. मंडळातर्फे त्यांच्या या योगदानाबद्दल मनःपूर्वक आभार.

मंडळाचे लेखा परीक्षक श्री विवेक प्रभाकर रानडे (रानडे ॲण्ड असोसिएट्स) तसेच सारस्वत बँक, जनता सहकारी बँक आणि स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार. मंडळाच्या अंतर्गत हिशोब तपासणीसाठी श्री. अनिकेत दीपक मराठे यांचे अमूल्य सहकार्य लाभले, त्याबद्दलही आभार. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व सभासदांचे मंडळ आभारी आहे.

श्री देव गजानन सर्वांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य देवो. सर्वांच्या मनोकामना व इच्छाआकांक्षा पूर्ण होवोत, अशी श्री गजानन चरणी मनःपूर्वक प्रार्थना करून आपल्या सर्वांच्या सहकार्याची भविष्यातही अपेक्षा ठेवून हा अहवाल पूर्ण करीत आहोत.

🌺 स्नेहसंमेलन 🌺

दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. पुणेकर ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन आयोजित केलेले हे स्नेहसंमेलन पुण्यनगरी येथे अत्यंत उत्साहात व आपुलकीच्या वातावरणात संपन्न झाले. संमेलनासाठी योग्य अशी जागा ठरविणे, कार्यक्रमाचे नियोजन तसेच इतर सर्व आवश्यक बाबींची पूर्तता करण्यात आली. यासोबतच सर्वांच्या परस्पर सहकार्याने चविष्ट व रुचकर भोजनाची व्यवस्था अतिशय उत्तम प्रकारे करण्यात आली होती. कार्यक्रमस्थळी प्रवेशद्वाराजवळ आकर्षक व सुंदर रांगोळी काढण्यात आली होती. मधुर स्वरातील वाद्यसंगीताच्या लयबद्ध सुरुवातीने कार्यक्रमाचे वातावरण अधिकच उत्साही झाले. यावेळी श्री गणेशाची पूजा व आरती भक्तिभावाने संपन्न झाली. या निमित्ताने सर्व ग्रामस्थांनी आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देत आपुलकीच्या गप्पागोष्टी केल्या. पुढे छोटेखानी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. राधिका पाटणकर यांनी अतिशय प्रभावी, उत्साही व संयोजनबद्ध पद्धतीने केले. मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा देखील त्याच दिवशी व त्याच ठिकाणी संपन्न झाली. या सभेमध्ये प्रतिपदा ते पंचमी दरम्यान साजऱ्या होणाऱ्या माघी गणेशोत्सवातील विविध कार्यक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच इतर अनेक महत्त्वाच्या विषयांवरही विचारमंथन झाले. सदर सभा अतिशय खेळीमेळीच्या व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडली. सभेच्या शेवटी कार्यवाह श्री. चव्हाण यांनी उपस्थित सर्व सभासदांचे तसेच पुणेकर ग्रामस्थांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

स्थळ: मुंबई
दिनांक: २ सप्टेंबर २०२६

कार्यकारिणीच्या अनुज्ञेने

ग. पां. चव्हाण
कार्यवाह

सभासद संख्या

	हयात	दिवंगत	एकूण
आश्रयदाते	४	२	६
हितवर्धक	८	३	११
हितचिंतक	४	८	१२
आजीव सभासद	२०६	३९	२४५

सभासद वर्गणी

आश्रयदाते	२५००/-
हितवर्धक	१०००/-
हितचिंतक	५००/-
आजीव	२५०/-

नवीन झालेल्या सभासदांची नावे:

१. श्री रमेश गणपत कदम
२. श्री सुनील विठ्ठल जाधव
३. श्री सुभाष शिवाजी जाधव
४. श्री तन्मय सुरेश जाधव
५. श्री अथर्व राजेंद्र जाधव
६. श्री शशिकांत नारायण झगडे
७. श्री अभिषेक चंद्रकांत झगडे
८. श्री चंद्रकांत महादेव झगडे

श्रद्धांजली

अहवाल साली खालील सभासदांचे दुःखद निधन झाले.

१) कै. श्री. मनोहर कृष्णाजी पाटणकर दिनांक १३.०१.२०२६
२) कै. सौ. मेधा मुकुंद पाटणकर – दिनांक २०.०१.२०२६
३) कै. श्री. मंदार श्रीनिवास पाटणकर – दिनांक २५.०२.२०२६

यांचे प्रति श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. तसेच, ज्ञात-अज्ञात, हितचिंतक व ग्रामस्थ, ज्यांचा उल्लेख अनवधानाने राहून गेला असेल, त्यांचे प्रतिही श्रद्धाभाव व्यक्त करण्यात येत आहे. ईश्वर मृतात्म्यांस चिरशांती लाभो, ही प्रार्थना.

इमारत संवर्धन व परिसर विकास निधी

१) श्री मधुकर आत्माराम पाटणकर ₹१२,०००/-
२) श्री. आशुतोष मोहन पंडित ₹२,५२,०००/-

कासे ग्राम गजानन सेवा मंडळ

(नोंदणी क्र. एफ - ३८९८- मुंबई)

दिनांक ३१ मार्च २०२६ चा ताळेबंद

२०२४-२५	निधी व देणी		२०२५-२६
	सभासद निधी	67145.00	
67145.00	अधिक चालू वर्षातील जमा	2000.00	69145.00
65105.90	**समाज मंदिर निधी**		65105.9
169112.00	**नित्य पूजा व सांजवात निधी**	169112.00	169112
	इमारत संवर्धन व परिसर विकास निधी	1925733.00	2189733.00
1925733.00	अधिक चालू वर्षातील जमा	264000.00	
52313.00	**उत्सव निधी**		
	अधिक चालू वर्षातील जमा	52313.00	52313.00
	ग्राम विकास निधी	468097.80	
468097.80	अधिक चालू वर्षातील जमा	44621.34	512719.14
44754.00	**शिक्षण निधी**	44754.00	
	अधिक चालू वर्षातील जमा		44754.00
89434.72	**आरोग्य निधी**	89434.72	
	अधिक चालू वर्षातील जमा		
	वजा चालू वर्षातील खर्च	15000.00	74434.72
6000.00	**खर्चाची तरतूद**		6000.00
1698241.82	उत्पन्न खर्च खाते (मागील ताळेबंदाप्रमाणे)	1698241.82	
	अधिक चालू वर्षातील उत्पन्न खर्च खात्यातील फरक	133864.00	1832105.82
4585937.24	एकूण		5015422.58

टीप: विविध निधींसाठी जमा झालेल्या देणग्या संबंधित निधींकडे जमा दाखवल्या आहेत.

स्थळ: मुंबई
दिनांक : २.०९.२०२६

भूषण मालशे
खजिनदार

श्री मिलिंद म सुर्वे
कार्याध्यक्ष

कासे ग्राम गजानन सेवा मंडळ

(नोंदणी क्र. एफ - ३८९८- मुंबई)

दिनांक ३१ मार्च २०२६ चा ताळेबंद

२०२४-२५	मालमत्ता व येणी		२०२५-२६
5000.00	जमीन- श्री प ज पेंडसे यांनी दिलेल्या जमिनीची किंमत		5000.00
	समाजमंदीर बांधकाम - अधिक चालू वर्षातील खर्च	310718.40	
310718.40	वजा घसारा ५ टक्के	15535.92	295182.48
	आवार भिंत - मागील ताळेबंदाप्रमाणे	72174.60	
72174.60	वजा घसारा 2.5 टक्के	1804.37	70370.23
	नाटक साहित्य - मागील ताळेबंदाप्रमाणे	22230.00	
22230.00	वजा घसारा 10 टक्के	2223.00	20007.00
	नळ पाणी योजना - मागील ताळेबंदाप्रमाणे	8244.00	
8244.00	वजा घसारा १० टक्के	824.40	7419.60
	पत्र्याची शेड- मागील ताळेबंदाप्रमाणे	148636.05	
148636.05	वजा घसारा ५ टक्के	7431.80	141204.25
	लादी बांधकाम - मागील ताळेबंदाप्रमाणे	128491.30	
128491.30	वजा घसारा ५ टक्के	6424.57	122066.73
	गडघा बांधकाम - मागील ताळेबंदाप्रमाणे	30332.55	
30332.55	वजा घसारा ५ टक्के	1516.63	28815.92
	ग्रील - मागील ताळेबंदाप्रमाणे	128173.05	
128173.05	वजा घसारा ५ टक्के	6408.65	121764.40
	सीसीटीव्ही	35286.90	
35286.90	वजा घसारा १५ टक्के	5293.04	29993.87
	रेफ्रिजरेटर	7940.70	
7940.70	वजा घसारा १५ टक्के	1191.11	6749.59
	डॉ नाना परांजपे स्मृती रंगदालन	328519.80	
328519.80	वजा घसारा १० टक्के	32851.98	295667.82
42676.00	आयकर टीडीएस		59991.00
	गुंतवणूक मुदत ठेवी		
	सारस्वत बँक दादर शाखा	1243459.00	
	जनता सहकारी बँक पुणे माखजन शाखा	1051416.00	
	स्टेट बँक ऑफ इंडिया करी रोड शाखा	320000.00	
2836927.00	पुनर्गुंतवणूक ठेवींवरील ३१.०३.२०२६ पर्यंतचे येणे व्याज	918830.00	3533705.00
480586.89	रोख रक्कम व बँक मध्ये जमा		277484.70
	रोख	4750.00	
	सारस्वत बँक दादर शाखा	220580.78	
	जनता सहकारी बँक पुणे माखजन शाखा	47174.92	
	स्टेट बँक ऑफ इंडिया करी रोड शाखा	4979.00	
4585937.24	एकूण		5015422.58

टीप: विविध निधींसाठी जमा झालेल्या देणग्या संबंधित निधींकडे जमा दाखवल्या आहेत.

स्थळ: मुंबई
दिनांक : २.०९.२०२६

गणपत पां चव्हाण
कार्यवाह

विवेक प्र रानडे
चार्टर्ड अकाउंटंट
रानडे अँड असोसिएट्स

कासे ग्राम गजानन सेवा मंडळ
(नोंदणी क्र. एफ - ३८९८- मुंबई)
उत्पन्न व खर्च पत्रक - आर्थिक वर्ष २०२५-२०२६

२०२४-२५	खर्च		२०२५-२६
36000.00	श्री दैनंदिन पूजा		38251.00
24703.00	उत्सव धार्मिक खर्च		17608.00
25907.00	उत्सव किराणा सामान		26444.00
51295.00	उत्सव मजुरी		73875.00
81251.00	उत्सव खर्च		60720.00
53000.00	माघी उत्सवातील कार्यक्रम		38200.00
2350.00	किरकोळ खर्च		2811.00
14780.00	छपाई व लेखनसाहित्य		12890.00
7550.00	टपाल		3500.00
486.00	बिनशेती कर		486.00
16700.00	वीजदेयके		18200.00
42791.00	दुरुस्ती		7900.00
3063.25	बँक खर्च		2011.00
	मंडळाचे संकेतस्थळ निर्मिती		8000.00
	संमेलन खर्च		47251.00
3500.00	कायदेतज्ज्ञ सल्ला आणि इतर कागदपत्र खर्च		1923.00
3000.00	लेखा परीक्षक मानधन		3000.00
3000.00	इनकम टॅक्स रिटर्न चार्जेस		3000.00
12500.00	80G , Darpan नोंदणीकरण खर्च		
	घसारा		
	समाज मंदिर बांधकाम	15535.92	
	नाटक साहित्य	2223.00	
	आवार भिंत	1804.37	
	नळपाणी योजना	824.40	
	पत्र्याची शेड	7431.80	
	लादी बांधकाम	6424.57	
	गडगा बांधकाम	1516.63	
	ग्रिल	6408.65	
	सीसीटीव्ही	5293.04	
	रेफ्रिजरेटर	1191.11	
	डॉ नाना परांजपे स्मृती रंगदालन	32851.98	
88279.65			81505.46
41042.00	ग्राम विकास निधी कडे वर्ग	44621.00	44621.00
123125.10	उत्पन्न खर्च खात्याकडे वर्ग	133864.00	133864.00
634323.00	**एकूण**		**626060.46**

टीप: विविध निधींसाठी जमा झालेल्या देणग्या संबंधित निधींकडे जमा दाखवल्या आहेत.

स्थळ: मुंबई
दिनांक : २.०९.२०२६

भूषण मालशे
खजिनदार

श्री मिलिंद म सुर्वे
कार्याध्यक्ष

कासे ग्राम गजानन सेवा मंडळ
(नोंदणी क्र. एफ - ३८९८- मुंबई)
उत्पन्न व खर्च पत्रक - आर्थिक वर्ष २०२५-२०२६

२०२४-२५	उत्पन्न		२०२५-२६
10.00	सभासद वर्गणी प्रवेश फी		**40.00**
30452.00	" श्रीं " पुढील दान पेटीतील जमा		**18150.00**
423786.00	देणग्या सर्वसाधारण		**411683.00**
	इतर उत्पन्न		**4810.00**
166638.00	**मुदत ठेवींवरील व्याज**		**179304.00**
	सारस्वत बँक दादर शाखा	121127.00	
	जनता सहकारी बँक पुणे माखजन शाखा	52008.00	
	स्टेट बँक ऑफ इंडिया करी रोड शाखा	6169.00	
13437.00	**बचत खात्यावरील व्याज**		**12073.00**
	सारस्वत बँक दादर शाखा	7373.00	
	जनता सहकारी बँक पुणे माखजन शाखा	1222.00	
	स्टेट बँक ऑफ इंडिया करी रोड शाखा	3478.00	
------	आयकर परतावा		------
	उत्पन्न खर्च खात्याकडे वर्ग		
634323.00	**एकूण**		**626060.00**

टीप: विविध निधींसाठी जमा झालेल्या देणग्या संभंधित निधींकडे जमा दाखवल्या आहेत.

स्थळ: मुंबई
दिनांक : २.०९.२०२६

गणपत पां चव्हाण
कार्यवाह

विवेक प्र रानडे
चार्टर्ड अकाउंटंट
रानडे अँड असोसिएट्स